मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात पिंपरी-चिंचवड भक्तिरंगात न्हाले

## भक्ती-शक्ती चौकात पुष्पवृष्टी, अभंगांचा गजर अन् वारकऱ्यांची सेवा; शहरवासीयांनी घेतला पालखी सोहळ्याचा भक्तिमय अनुभव

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा बुधवार (दि. ८) पिंपरी-चिंचवड शहरात दाखल होणार या पार्श्वभूमीवर शहरातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. देहूकरांचा पाहुणचार घेऊन सोहळा पिंपरी-चिंचवडच्या दिशेने मार्गस्थ झाला. पालखी शहरात ५ वाजून १५ मिनिटांनी दाखल झाली. टाळ-मृदंगाचा गजर करीत, भगव्या पताका नाचवत, विणेच्या अखंड झंकारात, 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष करीत पंढरपूरकडे निघालेल्या जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे पिंपरीतील भक्ती-शक्ती स्मारक चौकात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.



या पालखी सोहळ्याला आमदार उमा खापरे, महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उपायुक्त अण्णा बोदडे आदी उपस्थित होते. प्रत्येक दिंडीप्रमुखाचे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने स्वागत करण्यात आले. निगडीत दाखल झाल्यानंतर पालखीच्या रथाचे सारथ्य महापौर रवी लांडगे यांनी केले.

पालखी शहरात दाखल होताच पुष्पवृष्टी करण्यात आली. या वेळी शहरवासीयांनी पारंपरिक वेष परिधान करून या सोहळ्यात सामील होत सोहळ्याचा आनंद घेतला. हा सोहळा पाहण्यासाठी शहरवासीयांनी गर्दी केली. काही ठिकाणी रस्ते व चौक बंद असले तरी मार्ग काढत पालखीचे लांबून का होईना दर्शन घेण्यासाठी दुपारपासूनच गर्दी केली होती. या वेळी भक्ती-शक्ती चौकात वैष्णवांचा भक्तीचा मळा फुललेला पहावयास मिळाला. कानाकोपऱ्यातून देहू येथून श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीबरोबर आलेल्या वारकऱ्यांचा भक्तीमय पालखी सोहळा उद्योगनगरीत दाखल दाखल झाला. या भक्ती सोहळ्याची अनुभूती पाहण्यासाठी शहरवासीयांनी देखील अलोट गर्दी केली होती.

महाराष्ट्राला आषाढी एकादशी वारीची फार मोठी परंपरा लाभली आहे. पंढपूरला पायी जाण्याची परंपरा शतकानुशतके सुरू आहे. लाखो भाविक पंढरपूर मंदिरात दर्शनासाठी येत असतात. टाळ-मृदुंगाच्या ठेक्यावर, 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या नामघोषात विठुरायाचे नामस्मरण करीत वारकरी नामस्मरणात तल्लीन होतात.

### महापालिकेकडून स्वागत

» कपाळी गंध, खांद्यावर भगवी पताका, गळ्यात टाळ, मुखाने हरिनाम घेत वारकरी पिंपरी-चिंचवड शहरात येत होते. त्यांच्या स्वागतासाठी निगडीतील भक्ती-शक्ती स्मारक चौकात महापालिकेने स्वागत कक्ष उभारला होता. दुपारपासून भक्तिगीते आणि अभंग यांनी वातावरण भक्तिमय झाले होते. पालखी स्वागतासाठी रांगोळ्याच्या पायघड्या घालण्यात आल्या होत्या. नागरिकांनी चौकात भक्तिगीते आणि अभंग यावर फुगड्या आणि फेर धरून वातावरणात चैतन्य निर्माण केले. पालखी सोहळा स्वागतासाठी भक्ती-शक्ती चौकात मंडप टाकण्यात आले होते. पालखीच्या पुढे-मागे मानाच्या दिंड्या आणि टाळ मृदंगाच्या गजरातील वारकऱ्यांची गर्दी झाली होती. भक्ती-शक्ती चौकाच्या चारही बाजूला गाड्यांची रांग लागली होती. त्यातून वाट काढत अबालवृद्धांसह, तरुणाई, परिवार, मित्रमैत्रिणी यांनी भक्ती-शक्ती चौकात गर्दी केली. कपाळावर नाम ओढून सेल्फी काढण्यात भाविक दंग होते.

# मोशी कचरा डेपो दुर्घटना:सहा वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावणारे असिस्टंट मॅनेजर सुनील कोरके अद्यापही बेपत्ता

## कचरा डेपो परिसरात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेला काही तास उलटून गेले तरी, येथे सुनील कोरके यांचा अद्यापही शोध लागलेला नाही.

**पिंपरी | प्रतिनिधी**

येथील कचरा डेपो परिसरात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेला काही तास उलटून गेले तरी, येथे असिस्टंट मॅनेजर म्हणून कार्यरत असलेले सुनील कोरके यांचा अद्यापही शोध लागलेला नाही. गेल्या सहा वर्षांपासून या ठिकाणी अत्यंत प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने आपले कर्तव्य बजावणारे सुनील कोरके या दुर्घटनेनंतर बेपत्ता झाल्याने त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मूळचे पंढरपूर जवळील करकंब येथील रहिवासी असलेले सुनील हे आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी आणि चांगल्या भविष्यासाठी चिंचवड येथे आपल्या



लहानशा कुटुंबासह स्थायिक झाले होते. मात्र, एका क्षणात घडलेल्या या घटनेने त्यांच्या हसत्याखेळत्या संसाराला मोठा धक्का दिला आहे.

त्यांचे चुलत भाऊ चेतन कोरके यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनील यांच्या वैयक्तिक आयुष्यातील संघर्ष आणि त्यांचा प्रवास अत्यंत भावुक करणारा आहे. मूळ गाव पंढरपूर भागात आई-वडील आणि लहान भाऊ राहत असताना, सुनील हे आपल्या कामाच्या निमित्ताने शहरात आले. सुनील हे जुळे भाऊ असून, त्यातील ते एक आहेत. अत्यंत मनमिळाऊ स्वभाव असलेल्या सुनील यांच्या घरात लग्नानंतर १० वर्षांनी नुकताच कुठे पाळणा हलला होता. त्यांना अवघ्या ८ महिन्यांचे लहान बाळ असून, त्याच्या आगमनाने संपूर्ण कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. चिंचवड येथील घरात आपल्या पत्नी आणि या लहानग्या बाळासोबत ते सुखाने संसार करत होते. मात्र, मोशी कचरा डेपोतील या दुर्घटनेने या संपूर्ण आनंदावर विरजण घातले असून, वडिलांच्या छत्रासाठी ते ८ महिन्यांचे निष्पाप बाळ आणि डोळ्यात आसवे घेऊन त्यांची पत्नी सुनील यांच्या वाटेकडे डोळे लावून बसले आहेत.

या दुर्घटनेची माहिती मिळताच त्यांचे मित्र आणि इतर नातेवाईक तातडीने आज सकाळीच घटनास्थळी आणि त्यांच्या घरी पोहोचले. सुनील यांचे चुलत बंधू चेतन कोरके यांच्यासह संपूर्ण कुटुंब सध्या मानसिक धक्क्यात आहे. कचरा डेपोच्या या ढिगाऱ्याखाली आणि परिसरात शोधकार्य वेगाने सुरू असले, तरी प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस माहिती न मिळाल्याने नातेवाईकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा आहे. एका निष्पाप कर्मचाऱ्याचा जीव असा टांगणीला लागल्याने संपूर्ण परिसरात आणि त्यांच्या मित्रपरिवारात प्रचंड हळहळ व्यक्त केली जात आहे.

# "सगळं जग दिसतंय, पण माझा नवरा कुठे दिसेना..."; मोशी दुर्घटनेनंतर दोन चिमुरड्यांना जवळ घेत पत्नीचा टाहो

## मोशी येथील भीषण दुर्घटनेला 24 तास उलटून गेले तरी, ढिगाऱ्याखाली अडकलेल्या सनी माने या कामगाराचा अजूनही शोध लागलेला नाही.

**पिंपरी | प्रतिनिधी**

"सगळं जग समोर दिसतंय, पण माझे कुंकू कुठे हरवलंय? कालपासून माझे डोळे त्यांनाच शोधतायत... कुठे आहेत ते?" दोन चिमुरड्यांना काळजाशी घट्ट कवटाळून एका हताश माऊलीने फोडलेला हा टाहो तिथं उपस्थित असलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आणणारा ठरला. मोशी येथील भीषण दुर्घटनेला २४ तास उलटून गेले तरी, ढिगाऱ्याखाली अडकलेल्या सनी माने या या कामगाराचा अजूनही कोणताही शोध लागलेला नाही. प्रशासनाकडून शोधमोहीम सुरू असली, तरी काळ जसा पुढे सरकतोय, तशी माने कुटुंबाची धडधड आणि काळजाचा थरकाप वाढत चालला आहे.



मोशीतील शास्त्रीनगर येथे राहणारे सनी माने गेल्या तीन वर्षांपासून कायमस्वरूपी वाहन चालक (ड्रायव्हर) म्हणून प्रामाणिकपणे कार्यरत आहेत. कष्ट करून आपल्या कुटुंबाला सुखात ठेवण्याचे त्यांचे स्वप्न आहे. त्यांच्या पत्नी आणि दोन मुले असा अत्यंत सुखी परिवार आहे. मोठा मुलगा ईशान्य (७ वर्षे) हा गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिकत असून, लहान मुलगा विहान हा अवघ्या दोन वर्षांचा आहे. परवापर्यंत हसतं-खेळतं असणारं हे कुटुंब आज एकाएकी काळाच्या क्रूर खेळामुळे अंधारात ढकललं गेलं आहे.

घटनेला २४ तासांपेक्षा जास्त वेळ उलटून गेला आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या इतर काही कामगारांची सुटका करण्यात यश आले असले, तरी सनी माने यांचा अजूनही ठावठिकाणा लागलेला नाही. पती सुखरूप परत येईल या आशेने त्यांच्या पत्नीची तहान-भूक हरपली आहे. डोळ्यांतील अश्रू सुकले आहेत, पण आशा जिवंत आहे. दरम्यान, दोन वर्षांचा लहानगा विहान "पप्पा कधी येणार?" असा निष्पाप प्रश्न विचारत आहे. त्या चिमुरड्याला काय उत्तर द्यावे, या विचाराने संपूर्ण परिसर हेलावून गेला आहे.

### "प्रशासनाचे शर्थीचे प्रयत्न सुरू, पण..."

» दुर्घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि बचावकार्यासाठी यंत्रणा तात्काळ घटनास्थळी दाखल झाली आहे. ढिगारा उपसण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून सनी माने यांच्यासह इतर अडकलेल्यांचा शोध घेण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. "लवकरच त्यांचा शोध लागेल," असे आश्वासन प्रशासनाकडून वारंवार दिले जात आहे, परंतु वेळ जसजशी निघून जात आहे, तशी नातेवाईकांची चिंता वाढत आहे.

### परिसरात हळहळ; सुखरूपतेसाठी प्रार्थना

» या दुर्घटनेमुळे मोशी परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. सनी माने हे स्वभावाने अत्यंत मनमिळाऊ आणि कष्टाळू असल्याने, ते सुखरूप बाहेर यावेत यासाठी संपूर्ण परिसरातील नागरिक देवाकडे प्रार्थना करत आहेत. त्या दोन लेकरांच्या माऊलीचा टाहो थांबवण्यासाठी आणि माने कुटुंबाला हा कठीण प्रसंग सोसण्याची ताकद मिळावी, हीच आता प्रत्येकाची भावना आहे.

# नियतीचा खेळ... एका उमलत्या संसाराचा करुण अंत!

## मोशी कचरा डेपो दुर्घटनेत दीड वर्षांपूर्वी थाटलेला संसार क्षणार्धात उध्वस्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपो येथे दिनांक ९ जुलै २०२६ रोजी दुपारी घडलेल्या भीषण दुर्घटनेत शिरसोली प्र.न. (ता. जि. जळगाव) येथील मूळ रहिवासी आणि निगडी (रुपिनगर) येथे स्थायिक असलेले भावेश मोहन वाणी (वय ३४) यांचे दुर्दैवी निधन झाले आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून, एका हसत-खेळत असलेल्या कुटुंबाचा आधार कायमचा हिरावला गेला आहे.




नियतीचा क्रूर खेळ असा की, ज्या दिवशी भावेश यांनी आपल्या जगाचा निरोप घेतला, त्या दिवशी दुपारी १ वाजून ३१ मिनिटांनी त्यांनी आपल्या पत्नीला 'जेवायला बसलो आहे' असा एक साध्या शब्दांतील मेसेज केला होता. कोणालाही कल्पना नव्हती की, पत्नीच्या फोनवर आलेला हा संदेश भावेशचा शेवटचा संवाद ठरेल. याच दिवशी दुपारी दीडच्या सुमारास मोशी येथील 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्पाची तीन मजली प्रशासकीय इमारत कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली कोसळली आणि क्षणार्धात जमीनदोस्त झाली. या ढिगाऱ्याखाली २० कामगार अडकले होते आणि त्यांना बाहेर काढण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका, एनडीआरएफ आणि भारतीय सैन्याने युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले होते.

भावेश हे मोहन वाणी यांचे एकुलते एक पुत्र होते आणि पाच वर्षांपूर्वी बहीण गमावलेल्या या कुटुंबासाठी तेच जगण्याचे एकमेव कारण होते. अत्यंत गरिबीच्या परिस्थितीत वडिलांनी घरोघरी जाऊन पापड आणि पाव विकून भावेशला लहानाचा मोठा केला होता, तर शिक्षणात हुशार असलेल्या भावेशने आपल्या कष्टाने स्वतःचे स्थान निर्माण केले होते. वृद्ध आई-वडिलांना सुखाचे दिवस दाखवण्याचे स्वप्न पाहणारा भावेश, निगडी येथे पत्नीसह वास्तव्यास होता आणि अवघ्या दीड वर्षांपूर्वीच त्यांनी आपला संसार थाटला होता.

ज्या मुलाला लहानाचे मोठे करताना वडिलांच्या हाताला फोड आले आणि ज्याच्या भविष्यासाठी आई-वडिलांनी आयुष्य वेचले, त्याच मुलाची अंत्ययात्रा काढण्याची दुर्दैवी वेळ आज त्यांच्यावर आली आहे. ही वेदना शब्दांच्या पलीकडची असून, शिरसोलीच्या या सुपुत्राच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. देव भावेश यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि या अस्मानी संकटात सापडलेल्या वाणी कुटुंबाला हे दुःख सहन करण्याचे बळ देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# पिंपरी-चिंचवडच्या सर्व 10 प्रभाग समित्यांवर भाजपाचा झेंडा; अध्यक्षपदे बिनविरोध

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व 10 प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजप नगरसदस्य - सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे


अर्चना कारंडे - अ प्रभाग

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व १० प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजपाच्या नगरसदस्यांची निवड झाली आहे. आता १३ जुलै रोजी या निवडणूक निकालाची औपचारिक घोषणा होईल, अशी माहिती महानगरपालिका सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी दिली.

प्रभाग समिती अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत आज दुपारी ३ ते सायंकाळी ५ ही होती. या काळात प्रत्येक प्रभागात १ याप्रमाणे भाजपकडून एकूण १० नगरसदस्यांनी अर्ज केले होते. तर राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या दोन्ही पक्षाच्या एकाही नगरसदस्याने उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे सर्व प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजप नगरसदस्यांची निवड निश्चित झाली आहे.

यामध्ये प्रभाग अ (राजगड) समिती अध्यक्षपदी अर्चना करांडे यांची, प्रभाग ब (सिंहगड) समिती अध्यक्षपदी मंदार देशपांडे, प्रभाग क (विजयदुर्ग) समिती अध्यक्षपदी निखिल बोऱ्हाडे, प्रभाग ड (देवगिरी) समिती अध्यक्षपदी सविता खुळे, प्रभाग इ (शिवनेरी) समिती अध्यक्षपदी अर्चना सस्ते, प्रभाग फ (तोरणा) समिती अध्यक्षपदी शिवानी नरळे, प्रभाग ग (पुरंदर) समिती अध्यक्षपदी मनिषा पवार, प्रभाग ह (प्रतापगड) समिती अध्यक्षपदी तृप्ती कांबळे, प्रभाग ज (रायगड) समिती अध्यक्षपदी आरती चोंधे आणि प्रभाग ल (लोहगड) समिती अध्यक्षपदी रेखा देवकर यांची निवड निश्चित झाली आहे, असे देखील पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले.



















# पुणे शहरातील रस्ते स्वच्छतेसाठी महापालिकेचा नवा प्रयोग

## 15 क्षेत्रीय कार्यालयांसाठी तीन महिन्यांचा पायलट प्रकल्प; रस्ते अस्वच्छ राहिल्यास दंड आणि ब्लॅकलिस्टची कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

शहराची वाढती हद्द आणि वाढलेल्या रस्त्यांच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने रस्ते स्वच्छतेसाठी नवा पायलट प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत १५ क्षेत्रीय कार्यालयांत एकूण ४,८१४ अतिरिक्त कंत्राटी सफाई कर्मचारी तीन महिन्यांसाठी नियुक्त करण्यात येणार असून, त्यासाठी दरमहा १३ कोटी रुपये खर्च होणार आहे. मात्र, या वेळी केवळ मनुष्यबळ पुरवण्यापुरतीच नव्हे, तर संबंधित परिसर स्वच्छ ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावरच निश्चित केली आहे. रस्ते अस्वच्छ राहिल्यास संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल आणि वारंवार निष्काळजीपणा झाल्यास त्याला ब्लॅकलिस्टही करण्यात येईल, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

सध्या शहरातील रस्ते स्वच्छतेसाठी १० हजार कर्मचारी तसेच यांत्रिक सफाई यंत्रणा कार्यरत आहे. तरीही अनेक ठिकाणी अस्वच्छतेच्या तक्रारी कायम असल्याने प्रशासनाने झाडणहद्दींचा फेरआढावा घेतला. समाविष्ट गावांमुळे वाढलेली हद्द आणि नवीन रस्त्यांमुळे विद्यमान मनुष्यबळ अपुरे पडत असल्याचे सर्वेक्षणात स्पष्ट झाले. यापूर्वी कंत्राटदार केवळ मनुष्यबळ उपलब्ध करून देत होते, तर त्या कर्मचाऱ्यांकडून काम करून घेण्याची जबाबदारी आरोग्य निरीक्षकांवर होती. मात्र, मंजूर संख्येपेक्षा कमी कर्मचारी उपलब्ध करणे, काम न करता वेतन अदा करणे आणि आर्थिक अनियमिततेच्या तक्रारी समोर आल्याने प्रशासनाने संपूर्ण यंत्रणेचे पुनर्मूल्यांकन केले.यासाठी शहरातील झाडणहद्दी, कायमस्वरूपी कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी आणि प्रत्यक्ष आवश्यक मनुष्यबळ, यांचे क्षेत्रीय कार्यालयनिहाय सर्वेक्षण करण्यात आले.

त्यानुसार १५ क्षेत्रीय कार्यालयांसाठी ४,८१४ अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा तीन महिन्यांचा पायलट प्रकल्प विद्यमान ठेकेदारांमार्फतच राबविण्यात येणार आहे. या नव्या पद्धतीनुसार ठेकेदारांनी केवळ कर्मचारी उपलब्ध करून देणेच नव्हे, तर नियमित रस्तेसफाई, झाडणकामाची नोंद ठेवणे आणि स्वच्छतेवर देखरेख ठेवणेही बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे मनुष्यबळ पुरवठ्यासोबतच प्रत्यक्ष कामाच्या गुणवत्तेची जबाबदारीही ठेकेदारांवर टाकली आहे. कामात हलगर्जीपणा आढळल्यास पहिल्या तक्रारीला एक हजार, दुसऱ्या तक्रारीला दोन हजार आणि त्यानंतर पाचव्या तक्रारीपर्यंत दंडाची रक्कम वाढवत पाच हजारांपर्यंत दंड आकारला जाईल. सहाव्या तक्रारीनंतर संबंधित ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करण्यात येईल, असे श्रीनाथ भिमाले यांनी स्पष्ट केले.



> **शहरातील रस्ते झाडण्यासाठी सध्या ८,४१४ कर्मचारी आहेत, त्याच ठेकेदारांना आणखी ४,७०९ कर्मचारी वाढवून देण्याचा निर्णय बैठकीत घेतला आहे. यामध्ये काम करण्याची सर्व जबाबदारी ठेकेदारावर राहील. सध्या शहरात झाडणकाम व्यवस्थित होत नसले, तरी प्रशासनाने केलेला खुलासा मला पटला, त्यामुळे आम्ही हा प्रस्ताव मंजूर केला आहे.**
>
> **- श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष, स्थायी समिती**

> **शहरात एकूण ९,२९८ झाडणहद्दी आहेत. सध्या महापालिकेचे आणि कंत्राटी मिळून १० हजार ६५ कर्मचारी सफाईचे काम करतात. प्रत्येक कर्मचाऱ्याला किमान ७०० मीटर रस्ता स्वच्छ करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. मात्र, वाढीव हद्द आणि नवीन रस्त्यांमुळे अतिरिक्त मनुष्यबळाची गरज निर्माण झाली असून, शहर अधिक स्वच्छ ठेवण्यासाठी हा पायलट प्रकल्प राबविण्यात येत आहे. यामध्ये रस्ते अस्वच्छ राहिल्यास संबंधित ठेकेदारालाच जबाबदार धरले जाईल.**
>
> **- संतोष वारुळे, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग**

# मोशी कचरा डेपो दुर्घटना : बचावकार्यादरम्यान 9 नागरिकांना काढले सुखरूप बाहेर; एकाचा मृत्यू

## भावेश वाणी यांचा उपचारापूर्वीच मृत्यू; 9 जणांची सुखरूप सुटका, एनडीआरएफ, सेना व महापालिकेकडून युद्धपातळीवर शोधमोहीम

**पुणे | प्रतिनिधी**

काल ८ जुलै रोजी मोशी कचरा डेपो येथील प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा ढीग कोसळून झालेल्या दुर्घटनेत बचावकार्यादरम्यान रात्री उशिरापर्यंत ९ नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्यात आले असून अविरतपणे चालू असलेल्या या बचावकार्यातील शोधमोहीमेमध्ये आज ९ जुलै रोजी सकाळी ९ च्या सुमारास एका नागरिकाला बाहेर काढण्यात आले असून या गंभीर अवस्थेतील नागरिकाला पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल केले आहे.





सकाळी रुग्णालयात गंभीर अवस्थेत दाखल करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव भावेश वाणी असे आहे. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता तपासणीअंती ते मृत असल्याची माहिती वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी दिली आहे.

महानगरपालिकेच्या मोशी येथील कचरा डेपो येथे ८ जुलै रोजी दुपारी दीडच्या सुमारास कचऱ्याचा ढीग इमारतीवर कोसळून दुर्घटना घडली. या इमारतीमध्ये अंदाजे २३ नागरिक अडकले होते. सुरुवातीस अशोक गुप्ता, मुनेंद्र कुमार, चंद्रशेखर सिंह, दिनेश सुतार, श्री बाला हे ५ नागरिक घटना घडल्यानंतर सुखरुप बाहेर पडले. मात्र इमारतीत १८ व्यक्ती अडकून पडले असल्याने त्यांना बाहेर काढण्यासाठी तातडीने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एन डी आर एफ), भारतीय सेना दल, महापालिका अग्निशमन दल, पीएमआरडीए अग्निशमन दल आणि पोलीस प्रशासन यांनी संयुक्तरित्या बचावकार्य सुरू केले. रात्री ८ पर्यंत या पथकाने सोमनाथ शेळके, सचिन दवडगाव, दादासाहेब आरडे, सुजाता शिंदे, रामप्रताप चव्हाण, रणवीर सिंह या ६ नागरिकांना सुखरुप बाहेर काढले. या तातडीने उपचारासाठी नजिकच्या रुग्णालयात हलविण्यात आले. इमारतीत अडकून पडलेल्या उर्वरित नागरिकांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचाव मोहीम राबविण्यात आली. रात्री दीड वाजेपर्यंत बचावकार्यादरम्यान ३ नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्यात आले. यामध्ये विजय सपकाळ, भूषण पाटील, महेश राऊत यांचा समावेश असून त्यांना उपचारासाठी नजिकच्या रुग्णालयात दाखल केले आहे.

अविरतपणे बचावकार्य सुरू असताना शोधमोहीम हाती घेण्यात आली. याकरिता राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाकडून श्वान पथकाची देखील मदत घेण्यात आली.

शोधमोहिमेदरम्यान इमारतीत अडकलेल्या इतर नागरिकांचा शोध घेण्यात आला त्यामध्ये सकाळी ९ च्या सुमारास भावेश वाणी यांना बाहेर काढण्यात आले. गंभीर अवस्थेत असलेल्या वाणी यांना तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. त्यावेळी ते मृत असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

दरम्यान, अद्यापही इमारतीत अडकलेल्या अंदाजे ८ नागरिकांचा शोध घेण्याची मोहीम युद्धपातळीवर सुरू असून युद्धपातळीवर शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे आणि वरिष्ठ अधिकारी हे घटनास्थळी उपस्थित राहून संपूर्ण बचावकार्यावर सातत्याने देखरेख ठेवत आहेत. यादरम्यान आज खासदार श्रीरंग बारणे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.